## भूसंपादन निर्देशन अर्ज क्र.४७/२००६
## निशाणी क्र.३३ खालील आदेश

प्रस्तुत अर्जाद्वारे सामनेवाला क्र.३ ने दि.२९/०८/२०१९ रोजीचा विना कैफियत आदेश रद्द करणेबाबत विनंती केली.

०२. अर्ज व अर्जदाराने दिलेले म्हणणे वाचले. सामनेवाला क्र.३ तर्फे वकील सौ. वर्षा पाटील व अर्जदार तर्फे वकील श्री. बी. टी. नवाळे यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

०३. सामनेवाला क्र.३ चे कथन की, अनावधाने व नजरचुकीने प्रस्तुत प्रकरणात कैफियत दाखल करणे राहुन गेले. सामनेवाला क्र.३ ला कैफियत दाखल करण्याची परवानगी न दिल्यास अपरिमित नुकसान होणार आहे. सबब, बचावाची संधी द्यावी अशी विनंती केली.

०४. अर्जदारने न्यायाच्या हितास्तव योग्य तो आदेश व्हावा अशी विनंती केली.

०५. सामनेवाला क्र.३, अर्जदार यांचा अर्ज, म्हणणे व युक्तीवादाचे विवेचन करण्यात आले. प्रस्तुत अर्जान्वये अर्जदाराने भुसंपादित जमिनीच्या वाढीव मोबदल्याची मागणी केली आहे. अर्जाचे स्वरुप पाहता सामनेवाला क्र.३ व अर्जदार यांचे प्रस्तुत वादामध्ये आर्थिक हितसंबंध गुंतलेले असल्याचे स्पष्ट होते. सामनेवाला क्र.३ ने अर्जात हजर होऊन मुदतीत कैफियत का देता आली नाही, याबद्दल दिलेले अर्जामधील कारण संयुक्तीक आहे. अर्जाचे स्वरुप पाहता सामनेवाला क्र.३ ला त्याची बाजु मांडण्याची संधी देणे न्यायोचित ठरते. सामनेवाला क्र.३ विरुध्द दिनांक २९/०८/२०१९ रोजी झालेला विना कैफियत आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी दिल्यास अर्जदाराचे कोणतेही नुकसान होणार

नाही. याउलट अर्जाचा निकाल गुणदोषावरुन उभय पक्षातील वादाला पुर्णविराम मिळेल. सबब, चर्चिल्या बाबी लक्षात घेता अर्ज मंजूर होण्यास पात्र ठरतो, असा निष्कर्ष नोंदवुन खालील आदेश पारित करण्यात येतो.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र.३ विरुध्द दिनांक २९/०८/२०१९ रोजी पारित झालेला विना कैफियत आदेश रद्द करण्यात येतो व अर्जास कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

३. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

सही/-

महाड
दिनांक २२/०२/२०२४

(**पी. एम. उन्हाळे**)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, महाड